ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख ७ ऑक्टोबर, १९५९ | अंक ४०

## विविध माहिती

**मोटारींचा कारखाना बंद**—अमेरिकेंतील जनरल मोटार्स ह्या कंपनीचा एक कारखाना पोलादाच्या पुरवठ्याच्या अभावीं बंद पडला आहे. अमेरिकेंत जुलै महिन्याच्या मध्यापासून पोलादाच्या कारखान्यांतील कामगार संपावर गेल्यामुळें त्याची झळ आतां पसरूं लागली आहे. मोटार कारखान्यानें कामगारांना कमी करण्यास प्रारंभ केला आहे.

**पोलादाला परदेशांची मागणी**—भिलई येथें रशिआच्या मदतीनें उभारण्यांत आलेल्या पोलादाच्या कारखान्याकडे परदेशांच्या मागण्या येऊं लागल्या आहेत. जपान, पाकिस्तान व इतर कांहीं देशांनीं ५८,००० टन अशुद्ध लोखंडाची मागणी केली आहे. ह्यापैकी बहुतेक लोखंड जपानला पुरविण्यांत येईल. पाकिस्तानला १३,००० टन लोखंड पुरविण्यांत येईल.

**आस्वानच्या धरणासाठी मदत**—आस्वान येथें बांधण्यांत येणाऱ्या नव्या धरणासाठी लागणारी यंत्रसामग्री व तांत्रिक साह्य पुरविण्याचा करार इजिप्त व रशिआ ह्या दोन देशांत करण्यांत आला आहे. पुढील महिन्यापासून अगर नोव्हेंबर महिन्यापासून रशिआकडून यंत्रसामग्रीचा पुरवठा होऊं शकेल, असा अंदाज आहे.

**म्हैसूर राज्यांतील साखरेचा पुरवठा**— दिल्ली येथील अधिकाऱ्यांनीं म्हैसूर राज्यासाठी करण्यांत येणाऱ्या साखरेच्या पुरवठ्यांत वाढ केली आहे. म्हैसूर राज्यासाठी ६८,५०० पोत्यांच्या ऐवजीं ७५,००० पोतीं देण्यांत येणार आहेत. त्यामुळें म्हैसूरमधील साखरेची टंचाई कमी होण्यास बरीच मदत होणार आहे.

**शिक्षकांची राहण्याची व्यवस्था**—खेडेगांवांत राहणाऱ्या शिक्षकांची राहण्याची व्यवस्था करण्याचा निर्णय मुंबई सरकारनें घेतला आहे. हा निर्णय चालू वर्षांतच अंमलांत आणण्यांत येणार आहे. शिक्षकांसाठी बांधण्यांत यावयाच्या घरांपोटीं सरकारला आठ लाख रुपये खर्च करावे लागणार आहेत. खेडेगांवांत शिक्षकांची राहण्याची फार अबाळ होते.

**वैतरणा धरणानजिक राहण्याची सोय**—मुंबईपासून ७५ मैलांवर असलेल्या वैतरणा धरणानजिक हौशी प्रवाशांची राहण्याची सोय मुंबई कॉर्पोरेशननें केली आहे. पुढील महिन्यापासून तिचा फायदा लोकांना घेतां येईल. प्रवाशांना राहण्यासाठी २० झोपड्या बांधण्यांत आल्या आहेत. त्यांतील दहांत हिंदी पद्धतीची व्यवस्था आहे.

**खेळांना उत्तेजन**—पाकिस्तानच्या स्पोर्टस कंट्रोल बोर्डानें निरनिराळ्या खेळांच्या संघटनांना साह्य देण्यासाठी ४५,००० रुपये मंजूर केले आहेत. खेळांचा दर्जा सुधारावा आणि आंतरराष्ट्रीय खेळांच्या स्पर्धांत पाकिस्तानच्या संघांना भाग घेतां यावा म्हणून हें उत्तेजन देण्यांत येत आहे.

**पाकिस्तानशीं होणारा व्यापार**—चालू वर्षाच्या पहिल्या सहामाहींत भारत व पाकिस्तान ह्यांच्या दरम्यान झालेल्या व्यापारांत भारताला २२,७०,००० रुपयांची अनुकूल तफावत लाभली आहे. गेल्या वर्षी ह्याच कालांत १५,६७,००० रुपयांची अनुकूल तफावत होती.

**बँकेमधील नोटा खराब झाल्या**—सुरत शहर व आसपासच्या भागांत तापी नदीला आलेल्या पुरामुळें सुरत शहरांतील एका बँकेच्या इमारतींत पाणी शिरलें होतें. बँकेच्या इमारतींत दोन दिवसपर्यंत ५ ते ६ फूट पाणी तुंबून राहिलें होतें. बँकेंतील कांहीं चलनी नोटा पाण्यामुळें खराब झाल्याचें समजतें. मात्र खराब झालेल्या नोटांचा नक्की आंकडा कळलेला नाहीं.

**नागार्जुनसागर धरणाची बांधणी**—नागार्जुनसागर धरणाच्या बांधणीचा सध्यांचा वेग चालू ठेवण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें आणखी १४ कोटी रुपये मंजूर करावे, अशी मागणी करण्यांत आली आहे. हें काम पूर्ण होण्यास १९६४ साल उजाडेल आणि तें पूर्ण झाल्यावर अन्नधान्याचें उत्पादन ९ लाख टनांनीं वाढेल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**खानदेशमधील जलप्रलयांत झालेली हानि**—पूर्व व पश्चिम खानदेश जिल्ह्यांत झालेल्या जलप्रलयामुळें १६० खेड्यांतील ४,८०० कुटुंबें निराश्रित झालीं आहेत. दोन्ही जिल्ह्यांत मिळून २२५ लाख रुपये किंमतीच्या मालमत्तेचें नुकसान झालें आहे. रस्ते व पूल नादुरुस्त झाल्यामुळें ३० लाख रुपयांचें नुकसान झालें आहे.

**गुदामें बांधण्यास अग्रहक्क**—नवे अन्नमंत्री श्री. स. का. पाटील ह्यांनीं अन्नधान्याच्या किंमती स्थिर राखण्यासाठी देशांत ५० लाख टन तांदूळ व गहूं ह्यांचा सांठा ठेवण्याचें ठरविलें आहे. हें शक्य व्हावें म्हणून अन्नधान्य सांठविण्याचीं गुदामें बांधण्याच्या कामाला प्राधान्य देण्यांत येणार आहे. गुदामें बांधण्यासाठी ४० कोटी रुपये लागतील.

**दामोदर खोरें योजना**—दामोदर खोरें योजनेच्या कॉर्पोरेशननें दामोदर नदीच्या खोऱ्याच्या विकासासाठी लागणाऱ्या पाण्यासंबंधीं एक अभ्यास-गट स्थापन केला आहे. खोऱ्यांत मोडणाऱ्या भागाच्या शेतकीविषयक, औद्योगिक, जलवाहतुकविषयक आणि इतर गरजांसाठी पाण्याचा किती पुरवठा लागेल त्याचा अभ्यास ह्या गटानें करावयाचा आहे.

### साध्या आणि स्वस्त पवनचक्क्यांचे नमुने

मध्यम आणि कमी वेगाच्या वाऱ्यावर चालू शकतील अशा दोन प्रकारच्या पवनचक्क्यांचे नमुने नवी दिल्ली येथील शास्त्रीय आणि औद्योगिक संशोधनमंडळाच्या पवनशक्ति योजना-विभागानें तयार केले असून त्यामुळें सर्वसाधारण भारतीय शेतकऱ्यांची साध्या आणि किंमतीनें स्वस्त असणाऱ्या पवनचक्क्यांची मागणी पुरी होऊं शकेल.

परदेशांहून आयात होणाऱ्या पवनचक्क्या महाग पडतात. शिवाय, वाऱ्याचा वेग दर ताशीं १५ मैल असल्यासच त्या चालतात. पण आपल्या देशाच्या निरनिराळ्या भागांत वाऱ्याचा वेग दर ताशीं अवघा ६ ते १० मैलच असतो. त्यांमुळें परदेशीय पवनचक्क्यांचा तितकासा उपयोग होऊं शकत नाहीं. या नव्या प्रकारच्या पवनचक्क्या बसविण्यासाठीं अंदाजें २,५०० रुपये खर्च येईल व १,००० गॅलन पाणी सेचण्यासाठी केवळ ३ नये पैसे इतका खर्च येईल असा अंदाज आहे.

ह्या दोन नव्या पवनचक्क्यांबाबतची माहिती नवी दिल्ली येथील शास्त्रीय आणि औद्योगिक संशोधनमंडळाकडून प्रसिद्ध होणाऱ्या जर्नल ऑफ सायंटिफिक अ‍ॅण्ड इंडस्ट्रियल रिसर्च या नियतकालिकाच्या ऑगस्टच्या अंकांत देण्यांत आली आहे.

### चालू वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांत ३१७·४ कोटी रुपये किंमतीच्या मालाची निर्यात

चहाच्या निर्यातींत सुमारें १० कोटी रुपयांची घट होऊनहि चालू वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांत एकूण ३१७·४ कोटी रुपये किंमतीचा माल निर्यात करण्यांत आला. गुदस्ताच्या याच काळांत ३०४·९ कोटी रुपये किंमतीचा माल निर्यात करण्यांत आला होता. १९५९ च्या पहिल्या सहामाहींत निर्यातींत अधिकाधिक वाढ होत असल्याचें दिसून आलें असून, सध्यांच्या कलावरून निर्यातींत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. भारताच्या पारंपरिक मालाच्या निर्यातीपेक्षा नव्या उद्योगधंद्यांच्या मालाच्या निर्यातींत ही वाढ झाली आहे. यावरून सरकारनें केलेल्या उपाययोजनांचा निर्यात वाढीवर इष्ट तो परिणाम होत असल्याचें दिसून येईल.

### मध्यवर्ती कामगार संघटनांची सदस्यसंख्या

इंडियन नॅशनल ट्रेडयुनियन काँग्रेस, ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस व हिंद मजदूर सभा या संघटनांच्या सदस्य संख्येबाबत भारत सरकारकडे ३१ मार्च, १९५९ पर्यंत आलेली माहिती:—

| संघटना | नियंत्रणाखाली कामगार संस्था | त्यांची सदस्य-संख्या |
|---|---|---|
| इ. नॅ. ट्रे. यु. कॉ. | १२६९ | १५०३६०५ |
| ऑ. इं. ट्रे. यु. कॉ. | १३३८ | १०८२५७२ |
| हिं. म. स. | ३२४ | ४००२९० |

### चार्टर्ड अकौंटंट श्री. चितळे ह्यांची नेमणूक

इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट्स ऑफ इंडियाच्या कौन्सिलची दहावी वार्षिक सभा नुकतीच झाली, त्या वेळीं परीक्षक कमिटीवर मुंबईचे श्री. एम. पी. चितळे ह्यांची निवड करण्यांत आली.

### हिंद सायकल्स लि. ला तोटा

हिंद सायकल्स लि. ला ३१ मार्च, १९५९ अखेर संपलेल्या वर्षी, डेव्हलपमेंट रिबेटसाठी ६४,९०० रु. बाजूस काढल्यानंतर, ५·५६ लक्ष रु. तोटा आला. त्यापूर्वीच्या वर्षी, ५·३७ लक्ष रु. घसारा काढून, १०,००० रु. डेव्हलपमेंट रिबेटसाठी बाजूस काढून आणि ३८,५०० रु. ची करासाठी तरतूद करून, कंपनीला १·३७ लक्ष रु. नफा झाला होता, आणि ७ रु. करमाफ डिव्हिडंड देण्यांत आलें होतें. ३१ मार्च,१९५९ अखेरच्या वर्षाचें डिव्हिडंड मिळणार नाहीं. विक्री २·२३ कोटी रुपयांवरून २·०६ कोटी रुपयांवर उतरली. ४६,२३४ रु. डिव्हिडंड इ. रिझर्व्हजमधून काढून प्रेफरन्स भागांना डिव्हिडंड मिळेल.

### सुप्रीम कोर्टानें १३७ बँक नोकरांना पुनः काम दिलें

सुमारें आठ वर्षापूर्वी एका संपांत भाग घेतल्याबद्दल पंजाब नॅशनल बँकेनें आपल्या १५० नोकरांना कामावरून कमी केलें होतें. लेबर अपेलेट ट्रायब्यूनलनें त्यांपैकी १३६ नोकरांना पुनः कामावर घेण्याविषयीं बँकेस हुकूम केला होता. त्यावर बँकेनें सुप्रीम कोर्टाकडे अपील केलें होतें, तें आतां फेटाळण्यांत आलें असून ट्रायब्यूनलचा निवाडा कायम करण्यांत आला आहे. उरलेल्या १४ पैकी मुन्नालाल ह्या नोकरास बँकेनें कामावर घ्यावें, असेंहि सुप्रीम कोर्टानें फर्मावलें आहे. १३ नोकरांची नोकरी मात्र गेली आहे.

### इं. फि. कॉर्पोरेशन ५ कोटी रु. उभारणार

दि इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ४% व्याजाचें १२ वर्षें मुदतीचे, ९९·७५% दराचे ५ कोटी रु. चे बॉंड्स विक्रीस काढणार आहे. मुद्दल आणि व्याज ह्या बाबतींत बॉंड्सना मध्यवर्ती सरकारची हमी आहे. ५ ऑक्टोबर रोजीं विक्री सुरू झाली. १२ ऑक्टोबर रोजीं किंवा त्यापूर्वी पुरेसें कर्ज मिळाल्यास, विक्री बंद होईल.

### ब्रिटिश पार्लमेंटसाठी हिंदी उमेदवार

ब्रिटिश पार्लमेंटची सार्वत्रिक निवडणूक लवकरच होणार आहे. त्यांत लंडनच्या उत्तर केन्सिंग्टन मतदारसंघांतून एक हिंदी हॉटेलमालक उभा आहे. त्याचें नांव धनराज नागोराव नंदनवार असें आहे. तो विवाहित असून त्याला पांच अपत्यें आहेत. ह्या स्वतंत्र उमेदवाराच्या विरुद्ध मजूर, लिबरल व हुजूरपक्षाचे उमेदवार उभे आहेत. वर्णभेदाविरुद्ध मोहीम, ह्या उद्देशानें नंदनवार निवडणूक लढविणार आहे.

### दि पूना इलेक्ट्रिक सप्लाय कं. लि.

३१ मार्च, १९५९ अखेर संपलेल्या वर्षी वरील कंपनीनें ४·२८ लक्ष रु. नफा मिळविला. सबंध वर्षासाठी ८% डिव्हिडंड मिळेल. गेल्या वर्षी डिव्हिडंड ७½% मिळालें होतें. विजेच्या विक्रीपासून कंपनीला ६३·२३ लक्ष रु. मिळाले. अहवालाचे वर्षी कंपनीनें ७·३१लक्ष रुपयांचा भांडवली स्वरूपाचा खर्च केला.

दातांच्या स्वच्छतेसाठी
☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

# अर्थ

बुधवार, ता. ७ ऑक्टोबर, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## १९६१ ची शिरगणती : आर्थिक माहितीवर भर

श्री. अशोक मित्र, सेन्सस कमिशनर, ह्यांनीं १९६१ सालीं होणाऱ्या शिरगणतीच्या स्वरूपाची माहिती राज्यांच्या शिरगणती करणाऱ्या प्रमुख अधिकाऱ्यांच्या सभेंत सांगितली आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून प्रथमच शिरगणतींच्या व्याप्तींत सिक्किमचा व एजन्सीमधील विभागांचा समावेश करण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें, देशांतील निरनिराळ्या संस्थांनीं प्रदेशांचीहि शिरगणती करण्यांत येणार आहे. जम्मू व काश्मीर ह्या राज्यांतहि शिरगणतीचें काम करण्यांत येणार आहे. १९५१ सालीं जी शिरगणती करण्यांत आली त्या वेळीं देशांत पंचवार्षिक कार्यक्रमाच्या द्वारां आर्थिक विकास घडवून आणण्याच्या कामाला प्रारंभ व्हावयाचा होता. आगामी शिरगणतींत ह्या बाबतींत आतांपर्यंत काय कार्य झालें ह्याचा आढावा तर घेण्यांत येईलच; पण शिवाय, आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रांत भावी कालांत काय पुनर्घटना करणें आवश्यक आहे ह्याची रूपरेषा व्यक्त करण्यांत येईल. समाजशास्त्राच्या दृष्टीनें अतिशय महत्त्वाची अशी शास्त्रीय माहिती नव्या शिरगणतींत गोळा करण्यांत येईल. आर्थिक धोरणें ठरविण्यास उपयुक्त अशी मार्गदर्शनपर माहितीहि ग्रथित करण्यांत येईल. त्याहिपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे धोरणांच्या यशस्वीपणाच्या अगर अयशस्वीपणाच्या कसोट्याहि नमूद करण्यांत येतील. मूलभूत स्वरूपाच्या आर्थिक माहितीचें संकलन आणि त्याची फोड ह्या बाबींवर शिरगणतींत विशेष जोर देण्यांत येणार आहे. ही माहिती शेतीविषयक, घरकामविषयक आणि व्यक्तींच्या व राज्यांच्या आर्थिक व्यवहारासंबंधींची असेल.

देशाच्या आर्थिक विकासाचें मूल्यमापन करण्यास उपयोगी पडतील अशा प्रकारचीं दोन कोष्टकें तयार करण्यांत येणार आहेत. जमा केलेल्या माहितीचें व्यावसायिकदृष्ट्या व औद्योगिकदृष्ट्या वर्गीकरण करण्याचा प्रयत्न वरील कोष्टकांत करण्यांत येईल. धार्मिक व सामाजिक पंथांची माहिती व तपासणी राज्यघटनेच्या मर्यादेला धरूनच फक्त करण्यांत येणार आहे. पण शहरी राहणीची वाढ आणि औद्योगिक वाढ ह्यांचें मूल्यमापन विशेष कटाक्षानें करण्यांत येणार आहे. त्याशिवाय सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यांचीहि मोजणी करण्यांत येणार आहे. व्यावसायिक व औद्योगिक वर्गीकरणाचें पृथःकरण करण्याच्या कामीं शिक्षण, वयांचे स्त्री पुरुषांचे स्वतंत्र गट, इत्यादींचाहि उपयोग करण्यांत येणार आहे. शिरगणतीच्या कायद्यास धरून ह्या कामीं निरनिराळ्या व्यवसायांत गुंतलेले १० लाख नागरिक स्वार्थत्यागपूर्वक दीर्घ कालावधींत कार्य करीत राहतील. ते कांहीं वेतन घेणार नाहींत. हे १० लाख निर्वेतन मोजणीदार ८ कोटी घरांना भेटी देतील, व त्यांत राहणाऱ्या ४० कोटी लोकांची माहिती गोळा करतील. जगांतील एका फार मोठ्या लोकसमूहाची पद्धतशीर माहिती गोळा करण्याचा हा विशाल प्रयत्न आहे. त्याशिवाय ही माहिती गोळा करण्याचा खर्चहि अत्यल्प राहणार आहे. शिरगणती हें एक मोठें कारभारविषयक काम आहे. ह्या कामांत कांहीं थोडा काळ सर्व कारभारयंत्रणा एकदम राबविली जात असते. देशाच्या दूरदूरच्या कोपऱ्यांतून वसलेल्या लाखों घरांत पोंचण्याची सरकारला मिळालेली एक मोठी संधि, ह्या दृष्टीनें शिरगणतीचें फार महत्त्व आहे.

---

## इं. मो. फंडाच्या वर्गणीसाठी सोन्याची खरेदी

इंटरनॅशनल मोनेटरी फंडाची जादा ५ कोटी डॉलर्सची वर्गणी हप्त्याहप्त्यानें देण्यास भारतानें प्रारंभ केला आहे. ही वर्गणी सोन्याच्या स्वरूपांत द्यावयाची असते. त्यासाठी भारत सरकारनें लंडनमध्यें नुकतीच सोन्याची खरेदी केली. १८ सप्टेंबर, १९५९ अखेरच्या आठवड्यांत भारताच्या परराष्ट्रांतील शिलकांत झालेल्या घटीचें कारण हें आहे. येत्या कांहीं आठवड्यांत ह्याच पद्धतीनें आणखी सोनें खरेदी केलें जाईल. त्यामुळें, ऑक्टोबरअखेर परराष्ट्रीय शिलका आणखी घटत जातील. भारताच्या वाढलेल्या वर्गणीमुळें भारताला इं. मो. फंडांतून अधिक मोठ्या प्रमाणावर तात्पुरतीं कर्जें मिळूं शकतील, हें खरें असलें तरी तत्काळ मात्र आपल्या परदेशीय शिलका आणखी खाली जाणार आहेत. इं. मो. फंडाची बैठक दिल्ली येथें भरली होती, त्यांत सभासद-देशांची वर्गणी ५०% वाढविण्याचें ठरलें. त्यामुळें भारताची वर्गणी २० कोटी डॉलर्सनीं वाढून ६० कोटी डॉलर्स झाली आहे; त्यापैकी एकचतुर्थांश म्हणजे ५ कोटी डॉलर्स सोन्याच्या स्वरूपांत भरावयाचे आहेत.

---

## अल्पबचतीवर बँकांना कमिशन

दशवार्षिक ट्रेझरी सेव्हिंग्ज डिपॉझिट सर्टिफिकिटांची विक्री वाढविण्यासाठी, १ ऑक्टोबर १९५९ पासून, वसूल भांडवल आणि राखीव निधि ५ लक्ष रुपये वा त्याहून अधिक असलेल्या शेड्यूल्ड बँका आणि सहकारी बँका यांच्या सेवेचा उपयोग करून घेण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे. या बँकांमार्फत व त्यांच्या शिक्क्यानिशीं दशवार्षिक ट्रेझरी सेव्हिंग्ज डिपॉझिट सर्टिफिकिटांची खरेदी करण्यासाठी आलेल्या अर्जांवर त्यांना रु. ०·१२ टक्का या दरानें कमिशन देण्यांत येईल. तथापि अल्प बचत योजनेखालीं अधिकृत एजंटांना कमिशन मिळतच असल्यानें त्यांच्यामार्फत आलेल्या अर्जांवर कमिशन मिळणार नाहीं. यासंबंधीं अधिक तपशील रिझर्व्ह बँकेकडे मिळेल.

---

**पृथ्वीच्या चुंबकीय आकर्षणाचा नकाशा**—पृथ्वीच्या निरनिराळ्या भागांतील चुंबकीय आकर्षणाचा अभ्यास करणारी एक रशिअन बोट जगभर फिरत आहे. बोटीवरील शास्त्रज्ञानें अटलांटिक महासागरावरील आपलें संशोधन पुरें केलें आहे. पृथ्वीच्या चुंबकीय आकर्षणाचा एक नवा नकाशाहि ते तयार करणार आहेत. तो पुरा होण्यास ७ वर्षें लागतील.

### क्षयरोग्यांना मिळणाऱ्या उपचाराच्या सवलती

भारतांत सुमारें २५% लोकांना क्षयरोगाची बाधा झालेली आहे असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्या रोगाचा प्रसार मुख्यतः दारिद्र्यानें राहणाऱ्या कमी उत्पन्नाच्या लोकांत दिसून येतो. गेल्या कांहीं वर्षांत शहरांत झालेल्या लोकांच्या गर्दीमुळेंहि क्षयरोग पसरण्यास मदत झालेली आहे क्षयरोग्यांना औषधोपचार करण्याच्या सोयी-सवलती मात्र फारच अपुऱ्या व असमाधानकारक आहेत. गेल्या नऊ वर्षांच्या काळांत इस्पितळांतून क्षयरोग्यांसाठी ठेवण्यांत आलेल्या खाटांची संख्या दुप्पट झालेली असली तरी क्षयरोग्यांच्या संख्येचे मानानें त्या अपुऱ्याच आहेत. सध्यां १०० क्षयरोग्यांमागें एक खाट असें प्रमाण आहे. म्हणून इस्पितळांत दाखल होण्याच्या मार्गाशिवाय इतर साधनांचाहि अवलंब करावा लागत आहे. बी. सी. जी. लस टोचण्याचा इलाज हा रोग होऊं न देण्याचा उपाय आहे. त्याचा क्षयाची बाधा झालेल्यांना उपयोग होत नाहीं. जागतिक आरोग्य-संघटना, ब्रिटिश मेडिकल कौन्सिल आणि इंडिअन कौन्सिल ऑफ मेडिकल रीसर्च ह्या संस्थांनीं मद्रास राज्यांत गेलीं दोन वर्षें जें संशोधन केलें, तें ह्या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे. संशोधकांनीं असा निष्कर्ष काढला आहे कीं, क्षयरोगाच्या रोग्यांना घरींच ठेवून योग्य ती वैद्यकीय देखरेख ठेवण्यांत आली तर त्याचा चांगला उपयोग होतो. अर्थात् इस्पितळांत क्षयरोग्यांची शुश्रूषा अधिक चांगली होते. पण क्षयरोगांतून बरें होण्याचा अवधि बराच असल्यानें जरूर तितके दिवस इस्पितळांत राहून नंतर घरींच वैद्यकीय देखरेखीखालीं उपचार करीत राहणें पुष्कळशा रोग्यांना आर्थिकदृष्ट्याहि परवडण्यासारखें आहे. घरांतील मायेच्या वातावरणामुळें रोगी लवकर बरे होतात असेंहि आढळून आलें आहे.

---

### राजधानींत 'जनता' हॉटेल

राजधानी पाहण्यासाठी येणाऱ्या श्रीमंत लोकांसाठी हॉटेलें पुरेशीं आहेत, परंतु मध्यमवर्गीय पाहुण्यांसाठी 'जनता' हॉटेलसारख्या हॉटेलची अत्यंत गरज आहे. हें हॉटेल कोणत्याहि अर्थानें बादशाही असणार नाहीं व तें सुमारें दोन वर्षांत सुरू होईल असा अंदाज आहे. तसेंच स्वस्त दरांत सकस अन्नपदार्थ देणारें एक उपहारगृहहि सुरू करण्यांत यावयाचें आहे.

### गोहाटी येथील तेलाच्या शुद्धीचा कारखाना

गोहाटी येथें उभारण्यांत यावयाच्या तेलाच्या शुद्धीच्या कारखान्याच्या कामीं गेल्या कांहीं आठवड्यांत प्रगति झाली आहे. भारत सरकारनें नेमलेल्या एंजिनिअर्सची एक तुकडी गोहाटी येथें येऊन दाखल झाली असून त्यांनीं आपल्या कामाला प्रारंभ केला आहे. कारखान्याच्या कामासाठी लागणारी कचेरी व इतर आनुषंगिक इमारती ह्यांचें काम लवकरच चालू होईल. कचेरींतील नोकरवर्गाची भरतीहि चालू झाली आहे. खुद्द कारखान्याच्या उभारणीचें काम करण्यासाठी सुमारें ६,००० लोकांची गरज लागणार आहे. कारखान्यासाठी लागणारी जागा मिळविण्यांत आली असून ती सपाट करण्याचें काम चालू झालें आहे. कारखान्यासाठी लागणाऱ्या एकूण जागेपैकी एक-तृतीयांश म्हणजे सुमारें १८० एकर जागा सध्यां ताब्यांत घेण्यांत आली आहे. त्याशिवाय कारखान्याची कायमची वसाहत वसविण्यास आणखी जागा लागणार आहे. १९६१ सालीं कारखाना प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ करणार आहे. त्या दृष्टीनें यंत्रांची उभारणी, घरांची बांधणी व कचेऱ्यांची बांधणी हीं कामें झपाट्यानें करण्याचे प्रयत्न होत आहेत. पुढील महिन्यांत बरीच अवजड यंत्रसामग्री कारखान्याच्या जागीं पोंचेल. यंत्रसामुग्रीचा पहिला हप्ता लवकरच कलकत्ता बंदरांत येईल. तेलाचा कारखाना उभारण्याच्या कामाचा अनुभव असलेले कांहीं रुमेनिअन तज्ज्ञ कामावर देखरेख करण्यासाठी येणार आहेत. ऑइल इंडिआ लि. ह्या कंपनीनें भारत सरकारच्या संमतीनें तेल वाहून नेणारे १६ इंच व्यासाचे नळ तयार करण्याची मागणी एका ब्रिटिश कंपनीकडे नोंदविली आहे. कारण, गोहाटी येथील कारखान्याला लागणारें अशुद्ध तेल खाणीपासून नळांच्या साह्यानें पुरविण्यांत येणार आहे.

---

### रेडिओ सीलोन व भारतीय चित्रपट

कांहीं चित्रपटांच्या निर्मात्यांस आपल्या चित्रपटांची रेडिओ सीलोनच्या कमर्शियल ब्रॉडकास्ट सर्व्हिसद्वारें जाहिरात करण्यासाठी परकीय चलन देण्यांत आलें नसतांनाहि या चित्रपटांची तशी जाहिरात केली जात असल्याचें रिझर्व्ह बँकेच्या निदर्शनास आलें आहे. याबाबत बँक योग्य ती चौकशी करीत असून ती अजून पूर्ण झालेली नाहीं.

## अमेरिकेबाहेरील प्रमुख कारखान्यांचा तपशील

### पहिल्या दहांतील पहिले चार ब्रिटिश किंवा अँग्लो-डच

| कंपनी | विक्री (दशलक्ष डॉलर) | जिंदगी (दशलक्ष डॉलर) | निव्वळ नफा (दशलक्ष डॉलर) | पूर्वीच्या वर्षांतील अनुक्रम |
|---|---|---|---|---|
| १ रॉयल डच शेल (ब्रिटिश-डच) ... | ५,४७२ | ७,६२३ | ४२१ | १ |
| २ युनिलिव्हर (ब्रिटिश-डच) ... | ३,५३५ | १,९२६ | १३१ | २ |
| ३ ब्रिटिश पेट्रोलियम (ब्रिटिश) ... | १,६७५ | १,५८९ | १७३ | ३ |
| ४ इंपीरियल केमिकल इंडस्ट्रीज (ब्रिटिश) ... | १,२९५ | २,०२७ | ६४ | ६ |
| ५ नेसल (स्विस) ... | १,२३८ | १७२ | १५ | ७ |
| ६ फिलिप्स ग्लोइलॅपेनफॅब्रिकेन (डच) ... | ९४६ | १,०९९ | ६४ | ८ |
| ७ सिमेन्स (जर्मन) ... | ७९४ | ६६७ | १९ | १० |
| ८ अल्फ्रीड क्रप (जर्मन) ... | ७९४ | उपलब्ध नाहीं | उपलब्ध नाहीं | ९ |
| ९ ब्रिटिश मोटर कॉर्पोरेशन (ब्रिटिश) ... | ७४२ | ३३८ | २५ | १६ |
| १० ब्रिटिश अमेरिकन टोबॅको (ब्रिटिश) ... | ७२५ | १,००२ | ७२ | ५ |

## मॅनेजिंग एजंटांच्या कमिशनवर नियंत्रण

### ५० लक्ष रुपयांपेक्षा कमी नफ्याच्या कंपन्यांच्या मॅनेजिंग एजन्सीचें कमिशन अबाधित

मॅनेजिंग एजंटांच्या वेतनाबद्दलच्या कंपनी कायदा सल्लागार समितीच्या शिफारशी मध्यवर्ती सरकारनें स्वीकारल्या आहेत, त्याविषयीं अधिकृत सरकारी घोषणा लवकरच होईल. व्यापार-उद्योग मंत्र्यांनीं चंदिगढ येथें ह्याविषयीं कांहीं तपशील जाहीर केला आहे आणि कंपनी कायदा ॲडमिनिस्ट्रेशनचे सेक्रेटरी श्री. डी. एल. मुजुमदार ह्यांनीं त्याचा खुलासा केला आहे.

मॅनेजिंग एजंटांना किती वेतन मिळावें, ह्याचें आतां स्केल ठरविण्यांत आलें आहे. कंपन्यांच्या नफ्याच्या पहिल्या १० लक्ष रुपयांच्या १०% वेतन त्यांना मिळेल, आणि हें प्रमाण पुढें कमी कमी होत जाऊन एक कोटि रुपयांवरील नफ्याच्या ४% वर येईल. नवीन दर खालीलप्रमाणें असतील:—

| कंपनीचा निव्वळ नफा | मॅ. एजंटांचें वेतन |
|---|---|
| पहिले १० लक्ष रु. | १०% |
| पुढील १० लक्ष रु. | ९% |
| पुढील १० लक्ष रु. | ८% |
| पुढील १० लक्ष रु. | ७% |
| पुढील १० लक्ष रु. | ६% |
| पुढील २५ लक्ष रु. | ५½% |
| पुढील २५ लक्ष रु. | ५% |
| पुढील सर्व नफा (१ कोटी रुपयांवरील) | ४% |

कंपनीला तोटा आला किंवा पुरेसा फायदा झाला नाहीं, तर किमान ५०,००० रु. वेतन मिळूं शकेल; त्याला भागदार व सरकार ह्यांची संमति मात्र लागेल.

मॅनेजिंग एजंटांच्या वेतनाला कांहीं नियम असावेत, ह्याविषयीं कित्येक वर्षें चर्चा चालू आहे. भाभा कमिटीनेंहि ह्या प्रश्नाचा विचार केला होता, आणि लोकसभेंत कंपनी बिलावर चर्चा झाली, तेव्हांहि ह्या प्रश्नावर मतें व्यक्त झालीं होतीं. टॅरिफ कमिशनच्या कांहीं अहवालांतहि त्याचा उल्लेख आलेला आहे. नवीन अर्जदार व ज्यांचे एजन्सी करार पुन: मंजुरीस येतील अशांना वेतनाची नवी श्रेणी लागू होईल. १५ ऑगस्ट, १९६० नंतर मॅनेजिंग एजन्सीचे चालू करार रद्द होणार आहेत; ते नवे करण्यासाठीं सरकारकडे अर्ज करावे लागतील. त्या वेळीं कंपनी कायदा सल्लागार समिति प्रत्येक अर्जाचा विचार करून सरकारला योग्य ती शिफारस करील.

ज्या कंपन्यांचे वार्षिक नफे ५० लक्ष रुपयांपेक्षा जास्त आहेत अशांच्या मॅनेजिंग एजंटांनाच फक्त नव्या वेतनश्रेणीमुळें कमी वेतन मिळेल. ज्या कंपनीचा वार्षिक नफा एक कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे, अशांच्या मॅनेजिंग एजंटांना ह्यापुढें सुमारें ६·५ लक्ष रुपये वेतन मिळूं शकेल. ह्या नव्या वेतन-श्रेणीमुळें उद्योगपती औद्योगिक क्षेत्रांतून पळ काढण्याचा विचार करतील असा बिलकुल संभव नाहीं; कंपन्यांच्या नफ्याचा अधिक भाग कंपन्यांच्याच वाढीला उपलब्ध होऊन औद्योगिक प्रगतीस चालना मात्र मिळेल; औद्योगिक कंपन्यांची गंगाजळी वाढण्यास मदत होईल. मोठ्या कंपन्यांचे व्यवहार वाढत गेले म्हणजे त्यांचे नफेहि वाढतील आणि मॅनेजिंग एजंटांना त्याचा लहान वाटा मिळाला तरी त्या वाट्याची रक्कम मात्र कमी असणार नाहीं. अर्थात्, कांहीं मोठ्या मॅनेजिंग एजन्सी कंपन्यांचे शेअर थोड्या प्रमाणावर घसरणें असंभाव्य नाहीं.

---

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड रजतमहोत्सव

दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड पुणें, या संस्थेस सोमवार दि. २१ सप्टेंबर १९५९ या दिवशीं पंचवीस वर्षें पूर्ण झालीं. त्यानिमित्त 'रजतमहोत्सव समारंभ' त्या दिवशीं कंपनीचे मुख्य कार्यालयांत साजरा झाला.


सकाळीं सनई व चौघडा-वादन, पवमान, श्रीसूक्तजप व हवन आणि सत्यनारायणाची पूजा; दुपारीं पानसुपारी व प्रसाद आणि रात्रीं गायन, असा कार्यक्रम होता.

---

## आकाशवाणीवर 'पडसाद'

श्री. श्री. वा. काळे ह्यांच्या 'पडसाद' मालिकेंतील श्रुतिका बुधवार, दि. ७ ऑक्टोबर रोजीं पुणें नभोवाणीवरून 'गृहिणी'मध्यें ध्वनिक्षेपित होईल.


किर्लोस्कर
स्थापना १८८८
पावरवर चालणारा
उंसाचा चरक



कमी वेळेंत जास्तीत जास्त उसाचे गाळण करण्यासाठीं शेतकरी किर्लोस्कर चरकाचीच निवड करतात. रोलर्स, गिअर्स इत्यादी सर्व भाग उत्कृष्ट पोलाद, ओतीव लोखंड व गनमेटल-पासून तयार केलेले असून वर्षानुवर्षें बिनतक्रार काम देण्याच्या दृष्टीनेंच त्यांची रचना केलेली असते. बैलाकडून चालणारेहि चरक तयार होतात.

किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी (द. सातारा)

## लँड मॉर्गेज बँकांची कर्जविषयक अर्जांची तपासणी

(श्री. नी. आ. कल्याणी, चेअरमन, सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.)

तगाई अर्जांची तपासणी पद्धत व लँड मॉर्गेज बँकेकडील तपासणी अर्जांची पद्धत यांत गेल्या ५–६ महिन्यांच्या अनुभवावरून कामकाजांत ज्या कांहीं अडचणी आल्या आहेत त्या सारांशरूपांत देणें योग्य दिसतें. रेव्हिन्यू खात्यांतील अधिकारीवर्गाकडून तगाई अर्जांची जी तपासणी केली जाते त्यांत फक्त खातेउतारा व ७–१२ चे उतारे, पंचमगदूर, जमिनींच्या किंमती, जबाब, यावरतीच तगाई मंजूर करण्यांत येते. कांहीं तगाई अर्जांत मालकी हक्काबद्दलची जबाबदारी बहुतेक टाळली जाते आणि तीं प्रकरणें शिफारस होऊन बँकेकडे येतात. अर्थात् ही तपासणी लँड इंप्रुव्हमेंट ॲक्ट, तगाई मॅन्युअल, इत्यादींच्या आधारें केली जाते असें वाटतें. परंतु तीच तपासणी सहकारी कायदा व त्याखालील लँड मॉर्गेज बँकांचे नियम, जमिनींच्या किंमतीबाबतचे झालेले नियम व परतफेडीच्या पात्रतेचें पत्रक याला अनुसरून तपासणी झाल्यास लँड मॉर्गेज बँकांना कर्ज देण्यास हरकत येईल असें वाटत नाहीं. चालू परिस्थितींत सहकारी कायदा, नियम, कर्जाचे नियम वगैरेंना जबाबदार राहून काम करावें लागतें. पोटनियमांचें उल्लंघन झाल्यास बँकेवर त्याची जबाबदारी येते. बँकेच्या नियमाप्रमाणें लँड व्हॅल्युएशन ऑफिसर यांच्याकडून तपासणी होणें जरूर असून तारणावरील मालकी-हक्काबद्दल वकीलाकडून सर्टिफिकेट घेणें जरूर आहे. याशिवाय कर्जनिवारण कायद्याखाली दिवाणी कोर्टाकडून कूळ नाहीं याची खात्री करून घ्यावी लागते. सब-रजिस्ट्रारकडून १२ सालचें शोध सर्टिफिकेट मिळवावें लागतें. स्थावर मिळकतींत सज्ञान व अज्ञान अशा सहभागीदारांना बँकेचे सभासद करून घेणें भाग आहे. तारणाचे बाबतींत अनेक गुंतागुंतीचे कायदेशीर प्रश्न उद्भवतात. त्यांचें निरसन करून घेऊन हें काम बँकेस या जबाबदारींतून पार पाडतां येतें. बँकेकडे कर्जमागणी अर्जदारांस जी फी आकारली जाते त्याच्या निम्म्यानें तगाई अर्जदारांकडून फी घेतली जाते. मात्र कर्जाच्या प्रमाणांत शेंकडा ५ रु. प्रमाणें शेअर्स खरेदी करावे लागतात. परंतु कर्जाची फेड झाल्यावर सदर शेअर्सची रकम परत केली जाते.

---

## दि महाड को. अर्बन बँक लि.

चेअरमन : दत्तात्रय नरहर वैद्य, बी. ए., एलएल. बी.

ऑ. मॅ. डायरेक्टर : सुं. मे. बुटाला, बी. ए., एलएल. बी.

मॅनेजर : चिं. कृ. ओक.

वसूल भांडवल ९०,१५० रु., रिझर्व्ह फंड ६६,९०९ रु., इतर फंड्स ७०,५३८ रु., ठेवी ६,५७,२६२ रु., मुं. स्टे. को. बँक ओव्हरड्राफ्ट २,८७,६३५ रु., इन्व्हेस्टमेंटस ४,७२,८२० रु., कर्जे ५,१२,९९९ रु., नफा ५,१६२ रु., असें वरील बँकेच्या ३०–६–५९ अखेरच्या ताळेबंदांतील प्रमुख आकडे आहेत. थकबाकीच्या धोक्यामुळें बँकेनें फारच जपून व्यवहार केला. व्यवहार कमी झाल्यामुळें त्याचा नफ्यावर परिणाम होणें स्वाभाविक होतें. थकबाकीचा धोका टाळण्याची कसोशीनें काळजी घेऊन व्यवहार वाढविण्याचें धोरण बँकेनें स्वीकारलें आहे; त्याचा अनुकूल परिणाम पुढील वर्षाच्या नफ्यावर होईल. ३% डिव्हिडंड देण्यास २,७०४ रु. लागतील.

## श्रीवीरशैव को. बँकेची वार्षिक सभा

श्री वीरशैव को. बँक लि., कोल्हापूरची १८ वी वार्षिक सभा दि. २४ सप्टेंबर रोजीं झाली. अध्यक्ष श्री. चौगुले, यांनीं कै. तात्यासाहेब मोहिते ह्यांच्याविषयीं दुखवट्याचा ठराव मांडला, तो सभासदांनीं दीड मिनिटें स्तब्धता राखून पास केला. सभेच्या कार्यक्रमपत्रिकेवरील सर्व ठराव सर्वानुमतें मंजूर झाले. नवे पदाधिकारी खालीलप्रमाणें निवडून आले:—

अध्यक्ष—श्री. एम्. बी. चौगुले.

डायरेक्टर्स—श्री. एस. व्ही. नष्टे, डी. बी. खोत, डॉ. एस. एस. घाळी व सी. जी. हंशेटी.

सुपरवायझिंग बोर्ड—श्री. बी. के. डोईजड (चेअरमन), आर. टी. गाडवे व जी. व्ही. वाली.

सल्लागारमंडळ—श्री. सी. एन. आजरी (चेअरमन), एम्. एन. कोल्हापुरे, के. एस. तोडकर, बी. एस. बंदी, आय. व्ही. सत्रा, एस. एन. घुगरी. एस. एस. घाळी, एस. के. पट्टणशेट्टी.

लोकल ऑडिटर—सी. एस. हालपनवर, बी. कॉम. एफ. सी. ए.

अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत बँकेच्या प्रगतीचा व आर्थिक घडामोडींचा आढावा घेतला. शेवटीं मॅनेजर श्री. एम. जी. जोटकर ह्यांनीं सर्वांचे आभार मानले.

---

## दि जमखंडी अर्बन को. बँक लि.

प्रेसिडेंट : व्ही. एस. फडके, बी. एससी., एलएल. बी.

चेअरमन : एस. एम्. अथणी.

मॅनेजर : एम्. डी. खाडिलकर, जी. डी. सी. ॲंड ए.

वसूल भांडवल २,०७,१८० रु., रिझर्व्ह व इतर फंड २,९६,०५४ रु., ठेवी २३,६२,००८ रु., इन्व्हेस्टमेंटस ९,०४,०८१ रु., कर्जे ९,८२,४९१ रु., इमारत (वजा घसारा) ८४,७७७ रु., नफा २६,०२० रु. असे वरील बँकेच्या ३०–६–१९५९ अखेरच्या ताळेबंदांतील प्रमुख आंकडे आहेत. अहवालाच्या वर्षीं सर्व प्रकारच्या ठेवी, वसूल भांडवल व खेळतें भांडवल ह्यांत वाढ झाली आहे. ५% डिव्हिडंड देण्यास सुमारें ११,००० रु. लागतील. सिक्युरिटीजचे बाजारभावांतील चढ–उतारामुळें येऊं शकणाऱ्या नुकसानीबद्दल पूर्ण तजवीज झालेली आहे.

---

## दि. अष्टे को. अर्बन बँक लि.

चेअरमन : कला नाना बोंडे

मॅनेजिंग डायरेक्टर : एन. ए. रुकडे

वसूल भांडवल ५४,२५० रु., फंडस् १३,०२५ रु., ठेवी २,१५,१९२ रु., कर्जे १,९५,६१९ रु., नफा ५,२६५ रु., असे वरील बँकेच्या ३०–६–५९ अखेरच्या ताळेबंदांतील आकडे आहेत. बँकेनें अहवालाचे वर्षी खर्चांत व इतर बाबतींत काटकसर करून बँकेचा खर्च कमी केला आहे व जमेच्या बाजूस वाढ झाली आहे. ५% डिव्हिडंडला २,३५१ रु. लागतील. "बँक स्थापनेपासून ज्या लोकांच्याकडे कर्जाच्या येणें रकमा होत्या, त्या अहवालसालीं, दोन दाव्यांतील रकमा सोडून, सर्वच्या सर्व वसूल झाल्या आहेत." बँकेनें चालू वर्षी एक तपसमाप्ति-समारंभ साजरा करण्याचें योजिलें आहे. गेलीं बारा वर्षे बँकेचें धुरीणत्व श्री. रुकडे ह्यांनीं मॅनेजिंग डायरेक्टर ह्या नात्यानें केलें, त्याचा गौरवपर उल्लेख बोर्डानें आपल्या अहवालांत केला आहे.

**तिरुचिरापल्ली जिल्ह्यांत कोळसा**—तिरुचिरापल्ली जिल्ह्यांत एके ठिकाणीं लिग्नाइट जातीचा कोळसा अवघा १६ फूट खोलीवर मिळाल्याचें समजतें. कोळशासंबंधी अधिक तपास चालू आहे. तपासांत कोळसा मोठ्या प्रमाणावर आहे असें सिद्ध झालें तर तामीळनाड भागाच्या औद्योगीकरणाला खूपच अनकूल परिस्थिति लाभेल. ह्या भागांत असा कोळसा १८० फुटांपर्यंत खोदल्याशिवाय सांपडत नाहीं.

**पुरामुळें कारखान्यांचें नुकसान**—सुरत व त्याच्या आसपास तापी नदीला आलेल्या पुरामुळें २३९ कारखान्यांचें सुमारें २२ लाख रुपये नुकसान झालें आहे. कच्चा माल व पक्का माल ह्यांचें १७ लाख, यंत्रसामग्रीचें ३·४२ लाख व स्थावर मालमत्तेचें १·४४ लाख रुपये, असा नुकसानीचा तपशील आहे.

**चंद्रलोकावरील आरोहण**—अमेरिकन रॉकेट सोसायटीचे एक माजी अध्यक्ष मि. लॉरेन्स ह्यांनीं असें भाकित केलें आहे कीं, येत्या पांच वर्षांत मनुष्य चंद्रलोकावर आपला पाय ठेवील. पण चंद्रलोकावरील आरोहणानें कोठल्याहि देशाला लष्करी फायदा मिळेल असें मात्र नाहीं. अशा आरोहणाला केवळ शास्त्रीयदृष्ट्या महत्त्व राहील, असें त्यांचें मत आहे.

**मालाच्या जलद धावणाऱ्या गाड्या**—भारतामधील निरनिराळ्या रेल्वे-विभागांच्या अधिकाऱ्यांनीं जलद वाहतूक करणाऱ्या मालगाड्यांच्या संख्येंत व त्यांच्या संचाराच्या कक्षेंत वाढ करावी, अशा सूचना रेल्वे बोर्डानें दिल्या आहेत. अशा प्रकारच्या ४०० मालगाड्या सध्या सर्व रेल्वे मार्गांवर मिळून आहेत. त्यांच्याबद्दल विभागीय अधिकाऱ्यांचें मतहि चांगलें आहे.

**शांततेचा भारतीय प्रचारक**—मनुष्यामनुष्यांत शांततेचें व बंधुत्वाचें वातावरण निर्माण करण्याचा प्रचार करण्यासाठी श्री. मिश्रीलाल जयस्वाल नांवाचा भारतीय सायकलस्वार सात वर्षांपूर्वी निघाला होता. तो आतां दि हेग येथें पोंचला आहे. त्यानें आतांपर्यंत आशिआ, अफ्रिका व अमेरिका, येथील ८५ देशांतून प्रवास केला आहे.

**१० वर्षांनंतरचे मुलांचे पोशाख**—येत्या दहा वर्षांत १० ते १२ वर्षें वयाचीं मुलें बहुधा कागदाचे कपडे वापरूं लागतील असें मत एका ब्रिटिश पोशाखतज्ज्ञानें व्यक्त केलें आहे. हे कपडे बरेच महिने वापरल्यावर फाडून टाकण्यांत येतील. राणी एलिझाबेथचे कॅनडामधील दौऱ्यावर जाण्याचे कांहीं कपडे ह्या तज्ज्ञानें योजलेले होते.


**५०** वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९१८ | सारस्वत बँक गृह, मुंबई ४. | टेलिफोन : २७०९४

बँकेचे सभासद आणि ठेवीदार यांच्या सोईसाठी

आमच्या वरळी, दादर आणि पुणें शाखेंत माफक दरांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय करण्यांत आली आहे.

सविस्तर माहिती शाखाधिकाऱ्यांकडे मिळेल.

शाखा : फोर्ट, दादर, माहिम, वरळी, पुणें, बेळगांव.

महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, गिरगांव मुंबई ४.

*** दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड ***

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :–१० बुधवार पेठ, पुणें २ प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन ६५६३ ) | अध्यक्ष श्री. ग. रा. साठे | मुंबई शाखा :–८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १ कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन २५३४०८ )

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००

जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३०,४९०

खेळतें भांडवल ... ... रु. ५६,००,०००

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १½% टक्के ★ मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम्., एलएल्. बी. मॅनेजर

नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

# दि बेळगांव बँक लिमिटेड

बेळगांव

( शेड्यूल्ड बँक )

स्थापना १९३०

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्ये, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठी नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होम-सेव्हिंगजचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येते.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत यांची नेहमींच वाढ करीत असलेली

दि बेळगांव बँक लिमिटेड.

एच्. एस्. कुलकर्णी

जनरल मॅनेजर

# बँक ऑफ पूना, लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | | रु. १९,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. ११,५०,००० |

—: संचालक मंडळ :—

१. श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, चेअरमन
२. डॉ. ना. भि. परुळेकर, व्हाईस चेअरमन ( संचालक, सकाळ )
३. श्री. फ्रामजी पी. पोचा
४. श्री. गणपतराव काळुराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

अल्प मुदत ठेवींवर आकर्षक व्याज.

...शाखा...

पुणें (१) सदाशिव पेठ, (२) डेक्कन जिमखाना (३) सांगली.

हेड ऑफिस व सांगली शाखेंत अल्प भाड्यांत लॉकरची सोय.

मुख्य ऑफिस : ४५५ रविवार पेठ, पुणें

गो. गं. साठे
मॅनेजर

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१.

( स्थापना : १९११ )

चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :

भागीदारांतर्फे रु. ४४ लक्ष
मुंबई सरकारतर्फे रु. ८१ लक्ष

रु. १ कोटी, २५ लक्ष

गंगाजळी व इतर फंड : रु. ५३ लक्ष

एकूण ठेवी : रु. १२ कोटी

खेळतें भांडवल : रु. २४ कोटींचे वर

१० जिल्ह्यांमध्यें व मुंबई उपनगरांत मिळून ४३ शाखा

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.

स्थापना १९३६

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस :

पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई, गिरगांव, ३ मुंबई, दादर, ४. नासिक, ५. पुणें, ६. बार्शी, ७. लोणंद, ८. कोल्हापूर, ९. इलकर्णी, १०. इचलकरंजी, ११. फलटण.

३० जून, १९५९ अखेर

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ४,७५,००० |
| ठेवी | रु. | १,६८,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,९५,००,००० |

मुदत ठेवींवरील व्याज :

| १ वर्ष ते २ वर्षे | तीन वर्षे | ५ वर्षे | दहा वर्षे |
|---|---|---|---|
| रु. ३.०० | रु. ३.२५ | रु. ३.५० | रु. ४.०० |

रु. एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

दराबाबत चौकशी करावी.

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २.०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | २.५० |
| चालू डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | ०.५० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जन. मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८१३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.